क्रमांक : का.स./बैठक/२०६

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : १७ मार्च, २००४.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २० फेब्रुवारी, २००४ (शुक्रवार) रोजी झालेल्या २०६ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

१७.३.२००४

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

शासनाचे मुख्य सचिव - **अध्यक्ष**
सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

श्री.द.म.सुकथनकर - **सदस्य**
"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,
मुंबई - ४०० ०१८.

श्री.र.य.तांबे - **सदस्य**
ए-६००, शिवम अपार्टमेंट्स,
सुरेंद्रनगर, आरपीटीएस रोड,
नागपूर - ४४० ०१५.

श्री.हरिशंकरन् - **सदस्य**
कार्यकारी संचालक इन्फ्रास्ट्रक्चर,
इन्फ्रास्ट्रक्चर लिजिंग अँड फिनान्सिअल सर्व्हिसेस लिमिटेड,
आय.एल. अँड एफ.एस्. फिनान्सिअल सेंटर, प्लॉट क्र.सी-२२,
'जी' ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

शासनाचे प्रधान सचिव - **सदस्य**
नगर विकास विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

...२/-

| | | |
|---|---|---|
| महापालिका आयुक्त<br>बृहन्मुंबई महानगरपालिका,<br>मुंबई - ४०० ००१. | - | सदस्य |
| शासनाचे प्रधान सचिव<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,<br>मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |
| व्यवस्थापकीय संचालक<br>सिडको, निर्मल, नरिमन पॉईंट,<br>मुंबई - ४०० ०२३. | - | सदस्य |
| महानगर आयुक्त<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण. | - | सदस्य |

निमंत्रित :

शासनाचे सचिव
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

शासनाचे प्रधान सचिव (उद्योग)
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

शासनाचे सचिव (पर्यावरण)
उर्जा व पर्यावरण विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेपित :-

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि. प्राधिकरण.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

*********

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
## कार्यकारी समितीच्या २०६ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २० फेब्रुवारी, २००४ (शुक्रवार) |
| वेळ | : | सायंकाळी ३.०० वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री.अजित निंबाळकर<br>शासनाचे मुख्य सचिव | - | अध्यक्ष |
| श्री.रामानंद तिवारी<br>शासनाचे प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| डॉ.सुरेश जोशी<br>शासनाचे प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | - | सदस्य |
| श्री.अरुण कुमार मागो<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री.सुभाष लाला
शासनाचे सचिव,
नगर विकास विभाग

श्री.विश्वास धुमाळ
शासनाचे प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग

श्री.सुब्रतो राठो
अतिरिक्त महापालिका आयुक्त (पूर्व उपनगरे),
वृहन्मुंवई महानगरपालिका

डॉ.टी. चंद्र शेखर
अतिरिक्त महानगर आयुक्त / प्रकल्प संचालक

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.वि.कृ.फाटक
प्रधान प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सु.प्र.पेंढारकर
प्रमुख, नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सुरेश परदेशी
मुख्य लेखा अधिकारी व वित्तीय सल्लागार,
सचिव, कार्यकारी समिती (अतिरिक्त कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.अ.वि.देशिंगकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मुर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

**बाब क्र.१ : मुंबईच्या ईस्टर्न वॉटर फ्रंटचा व्हीजन प्लॅन तयार करण्यासाठी अर्बन डिझाईन रिसर्च इन्स्टिटयूट (यूडीआरआय) ची नेमणूक करण्याबाबत.**

**१.१** प्रस्तावाबाबत माहिती देताना, प्रमुख, नियोजन विभाग यांनी सांगितले की, दक्षिण मुंबईतील ससून डॉक पासून उत्तरेकडील वडाळा पर्यंतच्या १५ कि.मी. चा परिसर हा मुंबईचा ईस्टर्न वॉटर फ्रंट असून यामध्ये मुंबई पोर्ट ट्रस्टच्या अखत्यारीतील ७५२ हेक्टर जमीन आहे. मुंबई पोर्टच्या

कमी होत असलेल्या वाहतूकीमुळे बरीच जमीन कालबाहय जमीन वापराखाली आलेली आहे. जगातल्या इतर बंदराप्रमाणे मुंबई पोर्टच्या जमिनीचा पूर्ण विकास करणे आवश्यक आहे. या बाबीचे महत्व ओळखून शासनाच्या नगर विकास विभागाने महानगर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक टास्क फोर्स (Task Force) गठीत केला. यात मुंबई पोर्ट ट्रस्ट, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पर्यावरण खाते, झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण यांना प्रतिनिधीत्व देण्यात आले आहे. याशिवाय इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट ॲन्ड फायनान्सींग कॉर्पोरेशनचे श्री.नरसी मुनजी, अर्बन डिझाईन रिसर्च इन्स्टिटयूटचे श्री.राहूल मेहरोत्रा आणि बॉम्बे चेंबर्स ऑफ कॉमर्सचे प्रतिनिधी यांचा समावेश आहे. ईस्टर्न वॉटर फ्रंटसाठी व्हिजन प्लॅन बनविणे व पूर्ण विकासासाठी दूरगामी धोरण ठरविणे व त्यानुसार आराखडा तयार करणे हे टास्क फोर्सचे मुख्य काम आहे.

१.२ प्रमुख, नियोजन विभाग यांनी पुढे सांगितले की, अर्बन डिझाईन रिसर्च इन्स्टिटयूट आणि कमल रहेजा विद्यानिधी वास्तुशास्त्र व पर्यावरण संस्था यांनी यासंबंधी सर्वेक्षण व अभ्यास केला असून त्यांच्याकडे यासंबंधी माहिती उपलब्ध असल्यामुळे त्यांना त्यांच्या दिनांक २३ सप्टेंबर, २००३ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावानुसार "व्हिजन प्लॅन" (Vision Plan) तयार करण्याचे काम सोपवावे असे प्रस्तावित केले आहे. परंतु श्री.राहूल मेहरोत्रा हे टास्क फोर्सचे एक सदस्य असून ते अर्बन डिझाईन रिसर्च इन्स्टिटयूटचे कार्यकारी निदेशकसुध्दा आहेत हे कार्यकारी समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले. युडीआरआय ही एक ना नफा तत्वावर चालविण्यात येणारी संस्था असून सोसायटी अधिनियम व मुंबई पब्लिक ट्रस्ट कायदा अंतर्गत संस्थेचे पंजीकरण करण्यात आले आहे अशी माहिती देण्यात आली. श्री.राहूल मेहरोत्रा त्यांच्या हया दुहेरी भूमिकेत काम करणार आहेत. त्यांनी टास्क फोर्सच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यास अर्बन डिझाईन रिसर्च इन्स्टिटयूटची नेमणूक करण्यास हरकत नाही असे मत महानगर आयुक्त यांनी व्यक्त केले.

१.३ ईस्टर्न वॉटर फ्रंटच्या जमिनींच्या पूर्ण विकासाची योजना तयार करताना केवळ वास्तुशास्त्रीय आणि नगर रचना या दृष्टीकोनातून विचार न करता त्याच्या वित्तीय बाबींचा विचार व्हावा व

यातून मुंबई शहराला काय लाभ होईल याविषयीही विचार व्हावा असे बाब टिप्पणीवर चर्चा करताना सुचविण्यात आले. टास्क फोर्सचा एक सदस्य म्हणून मुंबई पोर्ट ट्रस्टचा या अभ्यासात सक्रीय सहभाग असावा असेही मत व्यक्त करण्यात आले. यावर महानगर आयुक्त म्हणाले की, पोर्ट ट्रस्ट ही केंद्र शासनाची संस्था असल्यामुळे तिच्या अधिपत्याखाली असलेल्या जमिनीचे नियोजन किंवा पुर्नवितरण करताना केंद्र शासनाच्या नौकानयन मंत्रालयाचे मत विचारात घ्यावे लागेल. यावर मा.अध्यक्ष म्हणाले, असे असले तरी, पोर्ट ट्रस्टच्या जमिनीच्या नियोजनासाठी व्हिजन प्लॅनचा भविष्यात बराच उपयोग होईल म्हणून करणे आवश्यक आहे.

१.४ सदर बाब टिप्पणीवर विचारविमर्श झाल्यानंतर कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९०३</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७चे पोटकलम (३)(ii) अन्वये प्रदान केलेले अधिकार तसेच प्राधिकरणाने आपल्या १०३ व्या बैठकीत पारित केलेला ठराव क्र.९४३ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन अर्बन डिझाईन आणि रिसर्च इन्स्टिटयूटला ईस्टर्न वॉटर फ्रंटचा व्हीजन प्लॅन बनविण्याच्या कामासाठी श्री.राहूल मेहरोत्रा, कार्यकारी निदेशक, अर्बन डिझाईन रिसर्च इन्स्टिटयूट हे टास्क फोर्सच्या सदस्यत्वाचा राजीनामा देतील या अटीवर रु.३.८६ लाखापेक्षा जास्त नसलेल्या शुल्कासाठी एकमेव स्त्रोत (सोल सोर्स) या तत्वावर सल्लागार म्हणून नेमणूक करण्यासाठी कार्यकारी समिती ठराव करीत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** कार्यकारी समिती अर्बन डिझाईन रिसर्च इन्स्टिटयूट बरोबर आवश्यक तो करार करण्यास आणि कराराच्या शर्तींचे पालन करुन व्हीजन प्लॅन वेळेत पूर्ण करण्यास आवश्यक ती कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.२ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गतच्या रस्ते विकास कामांच्या निविदांना मंजूरी देणेबाबत.**

२.१ बैठकीच्या सुरुवातीस सर्व सभासदांना मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या रस्ते विकास कामांच्या निविदा सूचनांच्या प्रती व इतर माहितीची विवरणपत्रे देण्यात आली.

२.२ बाब टिप्पणीचा तपशील विशद करताना अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी असे सादर केले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या सुमारे रु.२६४७.५८ कोटी खर्चाच्या अंमलबजावणीस शासनाने नोव्हेंबर, २००३ मध्ये मान्यता दिली असून, प्राथम्य १ अंतर्गत रु.१९८० कोटींचे प्रकल्प हाती घ्यावयाचे आहेत. बृहन्मुंबईतील रस्त्यांच्या जाळयाचा विचार करता दक्षिणोत्तर व पूर्व-पश्चिम असे एकुण १७ रस्ते महत्वाचे असून उपनगरासाठी एकूण १० रस्ते तीव्र वाहतूक वर्दळ असणारे आहेत. मॅकेन्झी अहवालातील हे १० रस्ते प्राथम्याने विकसित करण्यावर भर दिला आहे. या १० रस्त्यांची एकूण ३८ अंदाजपत्रके (ज्यामध्ये असाईड अंतर्गत सिप्झ व विमानतळ परिसरातील ९ रस्त्यांची कामे अंतर्भूत आहेत.) बनवून वृत्तपत्रात सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या आहेत. तसेच यापैकी काही रस्त्यांच्या रुंदीत अतिक्रमणे असून रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम करण्यासाठी त्याचे निष्कासन करावे लागणार आहे. त्याचबरोबर सुमारे ३५००० पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करावयाचे आहे. त्यानंतर मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांमधील प्रस्तावित रस्त्यांचे सादरीकरण करण्यात आले.

२.३ अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी पुढे अधिक तपशील देताना या कामांची अंदाजपत्रके प्रकल्प सल्लागारांनी बनविली होती व त्यासाठी सन २००२ च्या दरसूचीवर आधारीत होती, परंतु निविदापूर्व बैठकीमध्ये निविदाकारांनी निविदेतील Granular Sub Base, Weight Mixed macadam, Pavement Concrete व लोह सळया या बाबींचे दर बाजारभावाच्या तुलनेत कमी असून ते सुधारण्याची विनंती केली. त्याप्रमाणे बाजारभावाचा आढावा घेऊन वरील बाबींचे दर सुधारण्यात आले. तसेच ज्या ज्या निविदाकारांनी कोरे निविदासंच खरेदी केले त्या सर्वांना सुधारीत दर लेखी कळविण्यात आले. सुधारीत अंदाजपत्रकाची किंमत ही त्या त्या कामाच्या

मूळ अंदाजपत्रकाच्या तुलनेत सरासरी ७ ते ८% इतकीच वाढत होती. सुधारीत अंदाजपत्रकीय किंमतीनंतर फेर निविदा सूचना प्रसिध्दीस न देणेबाबत असा खुलासा केला की, सुधारीत अंदाज पत्रकाप्रमाणे किंमतीतील वाढ अल्प होती. तसेच सर्व इच्छूक निविदाकारांना याबाबतचा तपशील लेखी कळविण्यात आला होता. सदर कामे पुढील १५ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत.

२.४ अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी पुढे असेही सादर केले की, मागविलेल्या एकूण ३८ निविदांपैकी १७ देकार अंदाजपत्रकापेक्षा कमी दराचे ११ देकार अंदाजपत्रकीय दराचे तर उर्वरीत १० देकार अंदाजपत्रकापेक्षा ४% ते ३४.५०% इतक्या चढया दराचे आहेत. अधिक माहिती देताना त्यांनी असेही स्पष्ट केले की, २८ देकारांपैकी २५ देकार लघुत्तम निविदाकारांचे असून उर्वरीत ३ देकार (लघुत्तम निविदाकारांचे देकार तांत्रिकदृष्टया विसंवादी असल्याने) द्वितीय, चतुर्थ संवादी निविदाकारांचे आहेत.

२.५ महानगर आयुक्त यांनी सांगितले की, निविदेमधील सुधारीत कामांच्या अंदाजित किंमतीमधील बदलाबावत पुन्हा जाहिरात देण्यात आलेली नाही. तसेच सर्वसाधारण निविदा प्रकाशित झाल्यानंतर निविदांच्या अंदाजित किंमतीमध्ये बदलही करण्यात येत नाही. अंदाजित किंमतीत झालेला बदल संबंधित निविदाकारांना कळविण्यात आलेला आहे. यावर अभिप्राय देताना विधी सल्लागार यांनी असे मत दर्शविले की, सध्याच्या निविदा रद्द करुन फेरनिविदा मागविण्यास कदाचित प्राधिकरणास त्यापेक्षा जास्त दराच्या निविदा प्राप्त होतील. प्राधिकरणाने संबंधित निविदाकारास सुधारीत कामाच्या किंमती कळविण्यात आल्यामुळे पुन्हा जाहिरात देण्याची आवश्यकता नाही असे अभिप्राय दिले. सदर प्रस्तावास मा.अध्यक्षांनी सहमती दर्शविली.

२.६ प्रधान सचिव, नगर विकास विभाग व अतिरिक्त महापालिका आयुक्त यांनी दोन्हीही (तांत्रिक व देकार) सिलबंद लखोटे एकत्र उघडले अगर कसे याची विचारणा केली असता अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी असे सांगितले की, जागतिक बँकेच्या पध्दतीप्रमाणे निविदांचे दोन्ही लखोटे एकाचवेळी उघडण्यात आले व तद्नंतर निविदेतील पात्रता अटींचे अनुपालन होत आहे अगर कसे यांची छाननी करण्यात आली. यावेळी असे आढळले की, बाब टिप्पणीतील

कॉंक्रीट रस्त्याचे काम क्र.३, मुख्य जोडरस्ता, जोगळेकर नाला ते ओशिवरा आगार (MMRDA Works) या रस्त्यांसाठी मेसर्स आर.पी.शाह यांचा २.७०% कमी दराचा देकार सर्वात लघुत्तम आहे. मात्र मेसर्स आर.पी.शाह हे दोन्ही कामांसाठी निविदामध्ये नमूद केलेल्या अटी / शर्तींची पूर्तता करीत नाहीत हे स्पष्ट झाले असल्यामुळे प्राधिकरणास कमीत कमी खर्चाचा पर्याय म्हणून मेसर्स आर.पी.शाह यांना काम क्र.१० हे अंदाजित किंमतीच्या ५.५१% कमी दराने देण्याची शिफारस करण्यात येत आहे. त्यामुळे काम क्र.३ साठी मेसर्स शापुरजी पालनजी यांचा, वाटाघाटीनंतरचा देकार ०.२५% इतका कमी दराचा आहे व त्यांची निविदा संवादी आहे अशा द्वितीय निविदाकारांची शिफारस करण्यात आली आहे.

२.७ श्री.लाला, सचिव, नगर विकास विभाग यांनी निविदांमधील अटी व शर्तींबाबत विचारणा केली असता मुख्य अभियंता यांनी असे सादर केले की, निविदा सूचना कलम ४.५ (सी) प्रमाणे निविदाकारांच्या पात्रतेसाठी किमान आर्थिक उलाढाल व निविदांमध्ये नमूद केलेल्या प्रकारची कामे समाधानकारकरीत्या पूर्ण केल्याचा पूर्वानुभव तसेच एम-१० ग्रेड वा त्यावरील कॉंक्रीट इत्यादी दिलेल्या परिमाणात पूर्ण केल्याचा पूर्वानुभव निविदाकारास असणे आवश्यक आहे.

२.८ एका निविदा सूचनेद्वारे मागविण्यात आलेल्या निविदांमध्ये जर एखादा निविदाकार एकापेक्षा जास्त कामामध्ये लघुत्तम असल्यास एकापेक्षा जास्त कामे देण्याबाबतची निविदाकाराची क्षमता तपासताना निकषातील परिमाणाची एकत्रित बेरीज करुन ठरवावयाची आहे. परिणामी निविदाकाराने उपरोक्त अटींची पूर्तता करीत नसल्यामुळे त्यांची निविदा लघुत्तम असूनही बाब टिप्पणीतील निविदांतील कामाचा क्र.२ मे.रिलायन्स कन्स्ट्रक्शन कंपनी लि., निविदातील कामाचा क्र.३ मे.आर.पी.शाह आणि निविदातील कामाचा क्र.७ मे.रिलायन्स कन्स्ट्रक्शन कंपनी लि. यांना कामे देण्यात आलेली नाहीत. त्याऐवजी द्वितीय वा चतुर्थ संवादी निविदाकारांची निविदेची शिफारस करण्यात आलेली आहे. त्यांचा देकार प्रथम लघुत्तम निविदाकाराच्या देकाराच्या बरोबरीत आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे व जेथे हे शक्य झाले नाही तेथे अशा निविदा रद्द करुन फेरनिविदा मागविण्याचा प्रस्ताव समितीसमोर ठेवण्यात आलेला आहे.

२.९ या चर्चेच्या अनुषंगाने श्री.लाला, सचिव, नगर विकास विभाग यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, जरी प्रथम लघुत्तम यांची निविदा (तांत्रिकदृष्टया) विसंवादी असली तरी त्यांच्याऐवजी द्वितीय वा चतुर्थ निविदाकाराची संवादी निविदेची शिफारस करताना त्यांचा देकार प्रथम लघुत्तम निविदाकाराच्या देकाराच्या बरोबरीत आणणे आवश्यक आहे अन्यथा निविदा रद्द करुन पुन्हा फेरनिविदा मागविणे अधिक नियमानुसार होईल.

२.१० अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी पुढे असे सांगितले की, ज्या १० कामांकरीता मागविण्यात आलेल्या निविदेतील दर अंदाजित दरापेक्षा जास्त आहेत त्याबाबत माहिती देताना असे स्पष्ट केले की, काही रस्त्यांची कामे खडकाळ टेकडयांमधून जातात अथवा काही ठिकाणी भरावयाची उंची इ. जास्त आहे त्यामुळे अंदाजित कामांपेक्षा जास्त देकार निविदांमध्ये आले आहेत.

२.११ प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांनी असे सांगितले की, अंदाजपत्रक तयार करतेवेळी पुन्हा या बाबींचा विचार व्हावा जेणेकरुन भविष्यात अंदाजित किंमतीत सुधारणा करण्याची आवश्यकता भासणार नाही व हया बाबतीत आवश्यक ते स्पष्टीकरण बाब टिप्पणीत द्यावे. त्यांनी पुढे असे सांगितले की, जी कामे कठीण खडकाच्या टेकडयांमधून किंवा अडचणीच्या ठिकाणी करावयाची असतील त्या कामांच्या निविदांची अंदाजपत्रके तयार करताना सर्व संबंधित बाबींची तपासणी करुन अंदाजित किंमती निविदांमध्ये हयापुढे नमूद कराव्यात व त्याची खबरदारी घ्यावी. त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी अभियांत्रिकी विभागाने अंदाजित किंमत ठरविताना सर्व बाबी विचारात घ्याव्यात अशा सूचना दिल्या.

२.१२ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, २५ लघुत्तम देकार अंदाजित किंमतीपेक्षा कमी किंवा अंदाजित किंमतीइतके असल्यामुळे ते मान्य करण्यात यावेत. उर्वरीत ३ कामांच्या निविदांसाठी द्वितीय व चतुर्थ निविदाकारांचे देकार वाटाघाटी करुन हे प्रथम लघुत्तम निविदाकारांशी आणण्यास सांगावे अन्यथा निविदा रद्द करुन नव्याने कामासाठी जाहिरात देण्यात यावी.

२.१३ तसेच महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, ज्या १० कामांच्या निविदा हया अंदाजित किंमतीपेक्षा जास्त आल्या आहेत त्याबाबत पुन्हा जाहिरात देणे अधिक योग्य होईल किंवा ज्या निविदाकारांनी अंदाजित किंमतीपेक्षा जास्त दराची मागणी केली आहे ते निविदाकार जर अंदाजित किंमतीस किंवा लघुत्तम आलेल्या निविदामधील देकारास काम करण्यास तयार असतील तर त्यांना ती कामे देण्यात यावीत.

२.१४ सदर बाबीवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर कार्यकारी समितीने असे ठरविले की, बाब टिप्पणीतील प्रपत्र-३ मधील शिफारस केलेल्या २५ लघुत्तम निविदाकारांच्या निविदा मान्य करण्यात याव्यात. उर्वरीत ३ कामांच्या निविदांसाठी द्वितीय वा चतुर्थ निविदाकारांचे देकार हे प्रथम लघुत्तम निविदाकार देकाराशी आणण्यास तयार आहेत किंवा कसे याची पडताळणी करावी. संबंधित निविदाकारांनी लघुत्तम आलेल्या निविदाकारांच्या देकाराशी कामे करण्याची तयारी दर्शविल्यास ते देकार स्विकृत करावेत अन्यथा अशा सर्व निविदा रद्द करुन फेरनिविदा मागविण्याची कार्यवाही हाती घ्यावी.

२.१५ त्यानंतर असेही ठरविण्यात आले की, प्रपत्र-४ मधील जे १० देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा चढया दराचे आहेत त्या निविदाकारांच्या बरोबर वाटाघाटीने त्यांचे देकार ते अंदाजपत्रकीय दराएवढे किंवा जेथे प्रथम लघुत्तम निविदाकारांच्या ऐवजी अन्य निविदाकारांचे देकार विचारात असतील त्या ठिकाणी प्रथम लघुत्तम निविदाकारांच्या दराने करण्यास तयार आहेत याची पडताळणी करावी व तशी तयारी असल्यास ते स्विकृत करावेत. अन्यथा असे सर्व देकार रद्द करुन फेरनिविदा मागवाव्यात.

२.१६ वरील बाबी विचारात घेऊन कार्यकारी समितीने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढीलप्रमाणे ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९०४</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम (३)(iii) आणि त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती मुंबई नागरी पायाभूत सुविधा टिप्पणीतील **प्रपत्र-३** मधील शिफारस केलेल्या २५ लघुत्तम निविदाकारांच्या निविदा मान्य करण्यात याव्यात. (सदर प्रपत्र यासोबत जोडपत्र-१ म्हणून जोडले आहे.) उर्वरीत ३ कामांच्या निविदांसाठी द्वितीय वा चतुर्थ निविदाकारांचे देकार हे प्रथम लघुत्तम निविदाकार देकाराशी आणण्यास तयार आहेत किंवा कसे याची पडताळणी करावी. संबंधित निविदाकारांनी लघुत्तम आलेल्या निविदाकारांच्या देकारांशी कामे करण्याची तयारी दर्शविल्यास ते देकार स्विकृत करावे अन्यथा अशा सर्व निविदा रद्द करुन फेरनिविदा मागविण्याची कार्यवाही हाती घ्यावी.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्रपत्र-४ मधील जे १० देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा चढया दराचे आहेत त्या निविदाकारांच्या बरोबर वाटाघाटीने त्यांचे देकार ते अंदाजपत्रकीय दराएवढे किंवा जेथे प्रथम लघुत्तम निविदाकारांच्या ऐवजी अन्य निविदाकारांचे देकार विचारात असतील त्या ठिकाणी प्रथम लघुत्तम निविदाकारांच्या दराने करण्यास तयार आहेत याची पडताळणी करावी व तशी तयारी असल्यास ते स्विकृत करावेत. अन्यथा असे सर्व देकार रद्द करुन फेरनिविदा मागवाव्यात.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** सभेच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय निविदेनुसार आवश्यक असणा-या कागदपत्रांची पूर्तता करणे आदींसाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

——— oooooooooo ———

**जोडपत्र-१**

अ) उपनगरातील पुर्व व पश्चिम द्रुतगती रस्त्याच्या डांबरीकरणाची कामे (पी.डब्ल्यू.डी.) मंजूर केलेल्या निविदा

| निविदेतील कामाचे क्र. | कामाचे नांव | सुधारीत अंदाजित रक्कम रुपये | निविदेची रक्कम रुपये व निविदाकाराचे नांव | टक्केवारी | शिफारस |
|---|---|---|---|---|---|
| १. | पश्चिम द्रुतगती महामार्ग कलानगर ते वाकोला उड्डाणपूल | ३७,९१,०८,८१५.०० | ३६,१२,९०,७०१.०० मे.यु.पी.स्टेट ब्रीज कार्पोरेशन | ४.७०% कमी दराने | लघुत्तम |
| २. | पश्चिम द्रुतगती महामार्ग वाकोला उड्डाणपूल ते एअर पोर्ट जंक्शन | २१,८२,५०,०००.०० | २०,४३,०३,८२५.०० मे.रिलायन्स कन्स्ट्रक्शन | ६.३९% कमी दराने. | लघुत्तम |
| ३. | पश्चिम द्रुतगती महामार्ग एअर पोर्ट जंक्शन ते अंधेरी उड्डाणपूल | २७,०८,३९,४७०.०० | २४,३७,५५,५२३.०० मे.सुभाष प्रोजेक्ट आणि मार्केटिंग लिमिटेड | १०% कमी दराने | लघुत्तम |
| ४. | पश्चिम द्रुतगती महामार्ग अंधेरी उड्डाणपूल ते जे.व्ही.एल.आर. जंक्शन | २४,५७,४९,९८५.०० | २४,५७,४९,९८५.०० मे.महेश्वरी ब्रदर्स लि. आणि सुप्रिम इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. (जे.व्ही.) | अंदाजपत्रकाच्या दराने | लघुत्तम |
| ५. | पूर्व द्रुतगती महामार्ग गोदरेज कंपनी गेट ते (उत्तर) जे.व्ही.एल.आर. जंक्शन | १८,७१,१३,५९९.०० | १८,४६,४३,६९९.०० मे.एम.व्ही.आर. - जी.एल. | १.३२% कमी दराने | लघुत्तम |
| ६. | पूर्व द्रुतगती महामार्ग जे.व्ही.एल.आर. जंक्शन ते जी.एम.एल.आर. जंक्शन | २९,८१,४४,८४८.०० | २९,३९,४१,००५.६४ मे.एम.व्ही.आर. - जी.एल. | १.४१% कमी दराने | लघुत्तम |
| ७. | पूर्व द्रुतगती महामार्ग जी.एम.एल.आर. जंक्शन ते मुलूंड चेकनाका | १७,३७,२४,१०५.०० | १७,३७,२४,१०५.०० मे.जयहिंद इन्फ्रास्ट्रक्चर कं. | अंदाजपत्रकाच्या दराने | लघुत्तम |
| ८. | पश्चिम द्रुतगती महामार्ग जे.व्ही.एल.आर.जंक्शन ते आरे उड्डाणपूल उत्तर | ३०,०९,१७,९३२.०० | ३०,०९,१७,९३२.०० मे.महावीर कन्स्ट्रक्शन कंपनी | अंदाजपत्रकाच्या दराने | लघुत्तम |
| ९. | पुर्व द्रुतगती महामार्ग घाटकोपर ते गोदरेज कंपनी गेट | २८,७०,४२,५२८.०० | २८,७०,४२,५२८.०० मे.पी.बी.ए.इन्फ्रास्ट्रक्चर लि. | अंदाजपत्रकाच्या दराने | लघुत्तम |
| १०. | पश्चिम द्रुतगती महामार्ग टाईम्स ऑफ इंडिया उड्डाणपूल उत्तर ते आशानगर सब-वे | २६,१०,४५,१३०.४० | २६,१०,४५,१३०.४० मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि. | अंदाजपत्रकाच्या दराने | लघुत्तम |
| ११. | पश्चिम द्रुतगती महामार्ग कुलूपवाडी पादचारी सब-वे ते एस.एन.दुबे रोड जंक्शन | २९,६३,७६,२६८.५० | २९,६३,७६,२६८.५० मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर लि. | अंदाजपत्रकाच्या दराने | लघुत्तम |
| | एकूण रक्कम रुपये | २९१,८३,१२,६८०.९० | २८५,२७,९०,७०२.५४ | | |

| निविदेतील कामाचे क्र. | कामाचे नांव | सुधारीत अंदाजित रक्कम रुपये | निविदेची रक्कम रुपये व निविदाकाराचे नांव | टक्केवारी | शिफारस |
|---|---|---|---|---|---|
| | ब) उपनगरातील दक्षिणोत्तर व पूर्व पश्चिम रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणाची कामे (एम.एम.आर.डी.ए.) मंजूर केलेल्या निविदा. | | | | |
| १२. | मुख्य जोडरस्ता दहिसर ते एल.टी.रोड | ३५,३१,९२,८२३.०० | ३२,७४,४५,०६६.२० मे.रिलायन्स कन्स्ट्रक्शन कं. आणि जे.पी.इंटरप्रायझेस (जे.व्ही.) | ७.२९% कमी दराने | लघुत्तम |
| १३. | मुख्य जोडरस्ता ओशिवरा आगार ते वै.म.रोड | २२,६४,७३,२८८.०० | २२,२३,८४,३८०.७० मे.वालेचा इंजिनिअरिंग लि. | १.८१% कमी दराने | लघुत्तम |
| १४. | सायन धारावी जोडरस्ता व माहिम निसर्ग उद्यान रस्ता | ९,७३,०५,६३४.०० | ९,२१,८७,३५७.६५ मे.विशाल अमर (जे.व्ही.) | ५.२६% कमी दराने | लघुत्तम |
| १५. | जोगेश्वरी विक्रोळी जोडरस्ता विस्तार एस.व्ही.रोड ते जॉगिंग ट्रॅक वर्सोवा | २०,६८,८१,६८३.०० | १९,५४,८२,५०२.२७ मे.आर.पी.शाह | ५.५१% कमी दराने | लघुत्तम |
| १६. | लालबहादुर शास्त्री मार्ग सायन ते कांजूरमार्ग | *३३,१४,११,२१२.०० | ३०,५७,२६,८४३.०७ मे.अशोका बिल्डकान लि. | ७.७५% कमी दराने | लघुत्तम |
| १७. | लालबहादुर शास्त्री मार्ग कांजूरमार्ग ते मुलुंड चेकनाका | *२३,६२,१४,५६५.०० | २१,२७,११,२९५.७८ मे.अशोका बिल्डकान लि. | ९.९५% कमी दराने | लघुत्तम |
| १८. | स्वामी विवेकानंद रोड दहिसर ते जी.एम.एल.आर. | ३२,४५,९८,७१६.०० | ३२,४५,९८,७१६.०० मे.वालेचा इंजिनिअरिंग | अंदाजपत्रकाच्या दराने | लघुत्तम |
| | एकूण रक्कम रुपये | १७७,६०,७७,९२१.०० | १६८,०५,३६,०८१.६७ | | |
| | क) उपनगरातील एसाईड रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणाची कामे (एम.एस.आर.डी.सी.) मंजूर केलेल्या निविदा | | | | |
| १९. | साकी विहार रोड | १०,२७,७२,१८९.०० | १०,२७,७२,१८९.०० मे.आर.पी.शाह | अंदाजपत्रकाच्या दराने | लघुत्तम |
| २०. | महाकाली गुंफा रोड एम.आय.डी.सी. पर्यंत | ७,९२,४१,०१०.०० | ७,९२,४१,०१०.०० मे.विशाल अमर (जे.व्ही.) | अंदाजपत्रकाच्या दराने | लघुत्तम |
| २१. | अंधेरी घाटकोपर जोडरस्ता पश्चिम द्रुतगती महामार्ग ते साकीनाका जंक्शन | २६,०४,४१,२४१.०० | २५,७१,८५,७२५.५० मे.शापूरजी पालनजी | १.२५०% कमी दराने | लघुत्तम |
| २२. | अंधेरी-घाटकोपर जोडरस्ता साकीनाका जंक्शन ते पूर्व द्रुतगती महामार्ग (असल्फा मिसिंग लिंक वगळून) | २२,००,५५,६८७.०० | २०,४२,११,६७७.५० मे.पी.बी.ए.ईन्फ्रास्ट्रक्चर | ७.२०% कमी दराने | लघुत्तम |
| २३. | मरोळ मरोशी रोड आरे कॉलनी ते अंधेरी-घाटकोपर जोडरस्ता ते सहार आंतरराष्ट्रीय विमानतळ | १६,९०,३९,३३५.०० | १६,४४,०७,६५७.२२ मे.पी.बी.ए.ईन्फ्रास्ट्रक्चर | २.७४% कमी दराने | लघुत्तम |
| २४. | पश्चिम द्रुतगती महामार्ग ते सहार आंतरराष्ट्रीय विमानतळ ते अंधेरी कुर्ला रोड पर्यंत | २१,६७,६४,५३४.०० | २०,३१,०८,३६८.३६ मे.महावीर कंन्स्ट्रक्शन कं. | ६.३०% कमी दराने | लघुत्तम |
| २४. | धाकु रोड | १५,९९,०७,९४०.०० | १५,०७,२९,२२४.२० मे.महावीर कंन्स्ट्रक्शन कं. | ५.७४% कमी दराने | लघुत्तम |
| | एकूण रक्कम रुपये | १२०,८२,२१,९३६.०० | ११६,१६,५५,८५१.७८ | | |
| | एकूण रक्कम रुपये (अ+ब+क) | ५१०,२६,१२,५३७.९० | ५६९,४९,८२,६३५.९९ | | |

* मुळ अंदाजित किंमत